सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

तात्काळ

क्रमांक :-विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१५/2582

दिनांक 7 OCT 2015

प्रति,

प्राचार्य,

सर्व विना-अनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र, पदवी / पदविका संस्था.

सर्व विना-अनुदानित एम.बी.ए./एम.सी.ए. पदव्युत्तर पदवी संस्था.

विषय :- खुल्या प्रवर्गासाठी असलेली ईबीसी सवलतीची रक्कम वाटप करुन उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणेबाबत.

संदर्भ :- १) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १५/तंशिस/ विपत्ता प्र.९८८१/२०१५/१२७ दि. २८/०८/२०१५.

२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १५/तंशिस/ थकीत-ईबीसी/कुलकर्णी-बीड/२०१५/ १३१ दि. ०३/०९/२०१५.

३) या कार्यालयाचे पत्र क्र.विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१५/२३६६ दिनांक १९/०९/२०१५.

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सर्व विनाअनुदानित संस्थेतील खुल्या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०१३-१४ व २०१४-१५ ची शुल्क प्रतिपुर्तीची रक्कम या कार्यालयाव्दारे वाटप करण्यात आली आहे. तरी वरील संदर्भीय पत्रान्वये सदरहू प्रतिपुर्तीची रक्कम विद्यार्थ्यांना मिळाली नसल्याबाबत तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, ज्या संस्थांनी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ चे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा संस्थांनी ईसीएस व्दारेच रक्कम वाटप केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र त्वरीत या कार्यालयास सादर करावे. तसेच शैक्षणिक वर्ष २०१४-१५ करीता काही संस्था वगळता ज्याना ईबीसीची रक्कम अदा करण्यात आली आहे अशा संस्थांनी उपयोगिता प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केले आहे. परंतू सदर उपयोगिता प्रमाणपत्रावरुन ईसीएसव्दारे रक्कम वाटप केल्याचे दिसुन येत नाहीत.

तेव्हा ज्या संस्थांनी ईसीएसव्दारे ईबीसीची रक्कम वाटप केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केलेले नाहीत अशा संस्थांनी ईसीएसव्दारेच ईबीसीची रक्कम वाटप केल्याचे उपयोगिता प्रमाणपत्र **दिनांक ९/१०/२०१५ पर्यंत** सादर करण्यात यावे, जेणे करुन सदरचे उपयोगिता प्रमाणपत्र तंत्रशिक्षण संचालनालयास सादर करणे सोईचे होईल, याची नोंद घ्यावी.

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.